९२८

३२

नंबर कॉन/एल्. आर. - ४२

पुणे, दिनांक ६-११-७४.

परिपत्रक

विषय- जमीन एकत्रीकरण योजना

असाचे असे निदर्शनास आले आहे की जमीन एकत्रीकरण योजना तयार करताना तसंबंधी खातेदारांचे घेण्यांत येणारे संमती जबाब तसेच अधिकार अभिलेख संबंधीचे जाबजबाब, योजना कार्यान्वित करताना खातेदारांचेकडून घेण्यात येणाऱ्या कबजेपावत्या इत्यादि कागदपत्रावर स्वाक्षरी करताना सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/एकत्रीकरण अधिकारी हे बऱ्याचवेळी स्वाक्षरी खाली दिनांक घालीत नाहीत. त्यामुळे वर नमूद केलेल्या कागदपत्रावरून तक्रार आल्यानंतर सदर काम केव्हा झाले याबाबत अनुमान काढण्यास व सदरील कागदपत्र कोटीचे अगर त्याकामी पुरावा म्हणून नोंदवून घेण्यास अडचणी होते. तसेच एकत्रीकरण योजने-संबंधीच्या कागदपत्राच्या खातेदारांना नक्ला देण्यात येतात अशा नकला, पुरावा म्हणून न्यायालयांत हजर केल्या जातात. अशा नकलावर मूळ कागद केव्हा करण्यात आला त्या-बाबतची तारीख व इतर अपुर्तता असेल तर न्यायालयाकडून त्यावर विश्वास ठेवला जात नाही व अशा प्रकारचे कागदाचे खरेपणाविषयी न्यायालयाने मुद्दे उपस्थित केल्याचे आमचे निदर्शनास आले आहे. तरी या परिपत्रकाव्दारे अशा सूचना देण्यांत येत आहेत की, खातेदारांचे अधिकार अभिलेख दुरुस्तीसाठी, अदलाबदल करण्यासाठी घेण्यात येणारे जबाब, दुरुस्ती योजनासाठी घेण्यात येणारे जबाब, तसेच कबजेपावत्या इत्यादि सर्व कागदपत्रावर सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी/एकत्रीकरण अधिकारी अगर संबंधीत अधिकारी यांनी स्वाक्षरी करताना दिनांक दक्षतेने नमूद करावा. अशा कागदपत्रावर दिनांक लिहीण्यात आला नसल्याचे निदर्शनास आल्यास त्याबाबत गंभीरपणे दखल घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच यापुढे कोणत्याही कागदपत्राच्या नक्ला देताना ती पूर्णावस्थेत आहे याची खात्री करून नक्कल द्यावी. कागद अपूर्ण असल्यास संबंधित कर्मचाऱ्याचे डायरीचे आधारे ते पुर्ण करून घ्यावे व नंतर नक्कल द्यावी.

सही/- ज. आ. स. प्र. न. आ. पुणे यांची स्वाक्षरी आहे.

रा. बं. कुलकर्णी

जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य,
पुणे यांचे करिता.

८ NOV 1974

प्रत- सर्व उपसंचालक भूमि अभिलेख यांचेकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत- सर्व एकत्रीकरण अधिकारी व सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांच्याकडे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी रवाना.

प्रत- सर्व संकलकाना ( एकत्रीकरण शाखा) माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

ह./४११७४.